महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
**राज्य मराठी विकास संस्था**
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

नस्ती क्र.रामविसं/मोहम/प्र.क्र.६३/४२९/प्रकल्प-४/२०२०
दि. २४/०४/२०२४

## नोटीस/सूचना

**विषय : राज्य मराठी विकास संस्थेकडे असलेल्या तमिळ विद्यापीठ, तंजावर मोडी प्रकल्पांतर्गत एकूण २० हार्डडिस्कमधील हार्डडिस्कमधील डाटा तपासणे, नवीन SSD हार्डडिस्क खरेदी करणे, डाटा स्थानांतरित करणे या कामासाठी दरपत्रके मागविण्याबाबत.**

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे 'तमिळ विद्यापीठ, तंजावर' येथे असलेल्या मोडी हस्तलिखितांचे जतन, संवर्धन व संगणकीकरण करण्यात आले आहे. या प्रकल्पांतर्गत संगणकीकृत केलेल्या मोडी हस्तलिखितांच्या प्रतिमा या हार्डडिस्कमध्ये साठविण्यात आल्या आहेत.

या हार्डडिस्कमधील संपूर्ण डाटा व हार्डडिस्क तपासणे, नवीन हार्डडिस्कची खरेदी करणे व जुन्या हार्डडिस्कमधील डाटा नवीन हार्डडिस्कमध्ये स्थानांतरित (Transfer) करणे (ease of access सह) इत्यादी कामे करण्यासाठी सदर सूचनेद्वारे इच्छुक संस्थांकडून खाली नमूद केलेल्या कामाच्या स्वरूपानुसार व सोबत जोडलेल्या नमुन्यानुसार दरपत्रके सादर करण्यात यावीत.

| अ.क्र. | कामाचे स्वरूप |
|---|---|
| १ | संस्थेकडील हार्डडिस्कची तपासणी करणे. |
| २ | नवीन हार्डडिस्कची खरेदी करणे. (एकूण २०) (१ टीबी इतक्या क्षमतेची SSD ड्राईव्ह.) |
| ३ | जुन्या हार्डडिस्कमधील डाटा नवीन हार्डडिस्कमध्ये स्थानांतरित करणे |

सदर दरपत्रके संस्थेच्या कार्यालयात दि. ०८.०५.२०२४ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यात सादर करावीत. सदर दरपत्रके कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी उघडण्यात येतील.

(डॉ. शामकांत देवरे)
संचालक
राज्य मराठी विकास संस्था

भाग घेणाऱ्या अभिकरण/संस्थेचे लेटरहेड

संदर्भ क्र. :

दिनांक :

१) अभिकरण/संस्थेचे नाव :

२) पॅन क्रमांक :

३) जीएसटी क्रमांक :

४) संपर्क करावयाच्या व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक :

५) इ-पत्ता

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | HDD संख्या | दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | संस्थेकडील हार्डडिस्कची तपासणी करणे. तसेच, जुन्या हार्डडिस्कमधील डाटा नवीन हार्डडिस्कमध्ये स्थानांतरित करणे | २० | | |
| २ | नवीन हार्डडिस्कची खरेदी करणे. (१ टीबी SSD) | २० | | |
| | एकूण रक्कम | | | |
| ४ | वस्तू व सेवा कर व अन्य कर (असल्यास) | | | |
| | एकूण रक्कम (सर्व करांसह) | | | |

असे प्रमाणित करतो की, सदर कामासाठी निश्चित केलेल्या व शासनाच्या खरेदी धोरणातील सर्व अटी व शर्ती मान्य आहेत.

अभिकरण/संस्थेच्या अधिकृत
प्रतिनीधीची
स्वाक्षरी व शिक्का

अटी व शर्ती-

१) अभिकरण/संस्थेने स्वतःच्या लेटरहेडवर दरपत्रक सादर करणे बंधनकारक आहे.

२) अभिकरण/संस्थेचे GST प्रमाणपत्र, पॅन कार्ड व बँक खाते तपशील सोबत जोडणे बंधनकारक राहिल.

३) दरपत्रकात नमूद केलेले दर हे सर्व खर्चासहीत व करासहीत दरपत्रक व कागदपत्रे सीलबंद लिफाफ्यात सादर करावेत.

४) लिफाफ्यावर कामाचे नाव स्पष्टपणे नमूद करावे.

५) कमी दर असलेल्या अभिकरण/संस्थेस कामाचे आदेश देण्यात येतील.

६) सदर कामाचे दरपत्रक कोणत्याही वेळी रद्द करण्याचे, स्वीकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार हे मा. संचालक, राज्य मराठी विकास संस्था यांच्याकडे राखीव असतील.

७) सदर काम पूर्ण झाल्यानंतर रा.म.वि. संस्थेकडून देण्यात आलेल्या जून्या हार्डडिस्क ह्या रा.म.वि.संस्थेस परत करण्यात याव्यात.

८) सदर डाटा/हार्डडिस्क या अभिकरण/संस्थेला केवळ या कामाचा भाग म्हणून सोपविलेल्या आहेत. सबब सदर काम पूर्ण करून त्यांचे रा.म.वि.संस्थेकडे हस्तांतर केल्यानंतर कंपनीने त्यांच्याकडील हार्डडिस्क संस्थेस परत करून सदर डाटा तसेच त्या संदर्भातील सर्व माहिती त्यांच्या सर्व संगणकांवरून नष्ट करावयाची आहे. कंपनीने त्यांच्याकडे सदर डाटा तसेच माहिती कोणत्याही स्वरूपात जतन करायची नाही, तसेच ती कोणासही कधीही उपलब्ध करून द्यायची नाही, ही या कामाची प्रमुख अट आहे. सदर काम पूर्ण झाल्यानंतर या अटीचा भंग झाल्याचे आढळून आल्यास रा.म.वि.संस्थेस सदर अभिकरण/संस्थेकडून नुकसान भरपाई वसूल करण्याचा पूर्णपणे हक्क व अधिकार राहील.

८) आपण केलेले काम उच्च प्रतिचे असल्यास कोणत्याही प्रकारचा अधिकचा मोबदला देण्यात येणार नाही.

९) कोणत्याही शासकीय विभागाकडून काळ्या यादीत (black list) केलेले नसावे.

१०) अशा कामांच्या अनुभवी अभिकरण/संस्थेस प्राधान्य दिले जाईल.

११) सदर काम विहित वेळेत व योग्य पद्धतीने न केल्यास देयक अदा केले जाणार नाही.

१२) मा. संचालक, रा.म.वि.संस्था यांचे या कामाबाबतचे गुणप्रतीचे मुल्यांकन अंतिम राहील.

संचालक
राज्य मराठी विकास संस्था
मुंबई